# —:: शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ::—

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांस कार्यालयाकडून ओळखपत्रे पुरविण्यात आलेली आहेत. कार्यालयीन वेळेमध्ये या ओळखपत्रांचा सर्व संबंधितांनी वापर करणे बंधनकारक आहे. असे असतानाही सदर ओळखपत्रांचा काही सेवकांकडून कार्यालयीन वेळेत वापर होत नसलेचे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. तरी येथून पुढे कार्यालयीन वेळेमध्ये ज्या सेवकांकडून ओळखपत्राचा वापर होत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आलेस संबंधितांवर सेवानियमानुसार कारवाई करणेत येईल याची सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा–यांस कार्यालयाकडून गणवेश देणेत आला आहे त्यांनीही कार्यालयीन वेळेमध्ये त्याचा वापर करणे बंधनकारक आहे, ज्या सेवकांकडून गणवेशाचा वापर होत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आलेस संबंधितांवर सेवानियमानुसार कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

प्र कुलसचिव

जा.क्र.आस्थापना / 1653

दिनांक – 8 JUN 2018

प्रति,

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, समकक्ष अधिकारी
3. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
4. स्वीय सहाय्यक मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखाधिकारी यांना माहितीस्तव
5. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे (Intranet)